MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Issue-40, Vol-01, Oct. to Dec. 2021

Editor
Dr.Bapu G. Gholap

14) प्राचीन दफन संस्कृती—कुही
डॉ. विशाखा संजय कांबळे, नागपूर ||65

15) राजर्षी शाहू महाराजांचे सामाजिक विचार
प्रा. डॉ. प्रभाकर रामलिंग कीर्तनकार, पूर्णा ||67

16) पर्यावरण आणि कृषी विकास
प्रा. डॉ. मोहोकार हरिहर शिवदास, सिडको, नांदेड ||69

17) मराठवाड्यातील भूमिहीनांचा सत्याग्रह
प्रा. सुनिल ता. तोडे, डॉ.संजय गायकवाड , वसमत जि.हिंगोली ||72

18) महिलांचे राजकीय आरक्षणची गरज
प्रा.डॉ. प्रविण कनकुटे, जालना ||74

19) जागतिक कीर्तीचे ग्रंथपाल डॉ. एस. आर. रंगनाथन यांचे कार्य
प्रा. एस. बी. मस्के, लातूर. ||76

20) दलित साहित्याचे बदलते वास्तव
प्रा.डॉ. आवारे सी.एस., चौसाळा, ता. जि. बीड. ||79

21) आधुनिक तंत्रज्ञान आणि ग्रामीण संस्कृती : एक चिंतन
डॉ. मारोती माधवराव घुगे, घनसावंगी, जि. जालना ||81

22) लिंगभाव असमानता आणि सामाजिक दृष्टिकोन
डॉ. कन्नाडे एम. के., कोल्हापूर ||85

23) १९ वीं सदी में मेवाड़ में सामाजिक सुधार
निखिल कुमार, जयपुर ||89

24) गाँधी दर्शन में श्रम का महत्त्व
डॉ. संजीव कुमार, सुन्दरपुर, जिला. दरभंगा ||91

25) उपनिषदों में प्रतिपादित कतिपय नैतिक मूल्य
डॉ. रेखा अरोड़ा ||94

26) १९३५ का अधिनियम और संघीय व्यवस्था
नेहा कुमारी, बोधगया ||98

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

22

# लिंगभाव असमानता आणि सामाजिक दृष्टिकोन

डॉ. कन्नाडे एम. के.
समाजशास्त्र विभागप्रमुख
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

***********

**प्रास्ताविक:**

लिंगभाव असमानता ही भारतासमोरीलच समस्या नाही तर थोडया फार फरकाने ती सर्वच जगात दिसून येते. भारतीय समाजाचा विचार करता वैदिक कालानंतर लिंगभाव असमानता निर्माण झालेली दिसते.

समाज, कुटुंब व व्यक्तिचे अस्तित्व स्त्री पुरुषाच्या परस्पर सहकार्य, उत्कट प्रेम, सदभावना व त्याग यावर अवलंबून असते. 'यंत्र नार्यस्तु पूज्यमे रयन्ते तंत्र देवता: 'असा घोष करणारा भारतीय नारीजीवनाचा इतिहास स्फुर्तीप्रद आहे. He who has to fight the battle of life must have peace at home असे सुप्रसिध्द आंग्लवचन सार्थच आहे. जगातल्या प्रत्येक थोर पुरुषाच्या कर्तृत्वामागे एक स्त्री आहे, असे जे म्हटले गेले ते खरे आहे. मग ती स्त्री कधी प्रेयसीच्या रुपात असेल तर कधी मातेच्या स्वरुपात असेल, छत्रपती शिवरायांचे उदाहरण सर्वांना ठाऊकच आहे. तरीही पुरुषाच्या तुलनेत स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, धार्मिक, कौटुबिक इ. क्षेत्रात समान हक्क नाकारलेले दिसते.

**शोध निबंधाचा उद्देश (objective of study)**

१. समाजाचा स्त्री विषयक दृष्टिकोन अभ्यासने

२. समाजातील स्त्रियांचा दर्जा अभ्यासने

**गृहितके — Hypothesis**

१ स्त्री शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार झाल्यामुळे स्त्रीयांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा झालीअसावी.

२. आधुनिकीकरण, जागतिकीकरण यांच्या प्रभावाने स्त्रीकडे पाहण्याचा, किमान शहरी समाजाचा दृष्टिकोन बदललेला असावा.

**संशोधन पध्दती — Research methodology**

प्रस्तुत प्रश्नावली, मुलाखत आणि प्रत्यक्ष निरीक्षण या प्राथमिक सामुग्रीचा व विविध ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे या द्वितीयक सामुग्रीक आधार घेण्यात आला. स्वातंत्र्यानंतर भारताच्या घटनेने मानवी समतेचा पुरस्कार केला. ही समानता प्रस्थापित करताना घटनेने स्त्री व पुरुष हा भेदही जीवनातील विविध न्याय नीति संधी इ. दृष्टिनी काढून टाकला. भारतीय स्त्रियांना घटनेने समानाधिकार दिला आहे. स्त्रियांना घटनेने जरी समानाधिकार दिले तरी समाजाने मात्र तिला हा अधि ाकार उपभोगू दिला नाही. जसे १९३७ पूर्वी स्त्रीला नोकरी करुन उदरनिर्वाह करण्याची मुभा होती. पण ती मिळवीत असलेल्या पैशावर तिचा स्वत:चा अधिकर नव्हता तिने स्वकष्टाने मिळविलेले पैसे तिचा पती, बाप किंवा थोरला वा धाकटाही भाऊ—दीर कायदेशीरपणे घेऊन जात असे, तिला तक्रारीचाही अधिकार नव्हता. आज तिच्या पगारावर तिला कायदेशीर हक्क प्राप्त झाला. पण जवळ—जवळ ७० टक्के स्त्रियांना तो स्वत:च्या इच्छेप्रमाणे खर्च करण्याचा अधिकार मिळाला नाही.

काही महिन्यापुर्वी वर्तमान पेपरमध्ये बातमी वाचली, बायकोला पगार दिला पाहिजे ज्यामुळे तिची समाजामध्ये प्रतिष्ठा वाढेल पण कागदोपत्री कायदे करुन किंवा सक्ती करुन हया बाबी शक्य नसतात. आपणास माहिती आहे, भारतीय राज्यघटने पासून ते वेगवेगळ्या कायद्यान्वये स्त्रीला स्वातंर्त्य व समान अधिकार दिलेले आहेत. पण त्याचा विशेष उपयोग होत नाही. स्त्री स्वत: मिळविलेल्या पैशावर जर तीचा हक्क नसेल तर कायदा करुन फारसा उपयोग होणार नाही. त्यातूनही अनेक पळवाटा काढता येतात.

वरवर पाहता कुटुंबसंस्थेची रचना आदर्श असल्याचं दिसतं पण दिसतं तस नसतं प्रत्यक्षात ही अत्यंत दांभिक रचना आहे. स्त्रीच्या पातिव्रत्याचे पोवाडे गायले जातात. पण पुरुषाच्या पत्नीव्रत्ताचा उल्लेखही केला जात नाही. पूर्वी समाजात बहुपत्नी प्रथा होती. आज ती प्रथा बंद होऊन त्यांचे रुपांतर वेश्यालयं मध्ये झाले.

खरं तर पुरुष स्त्रीला घाबरतो. तिची क्षमता आपल्याहून मोठी आहे. हे त्यानं जाणलं आहे. स्त्री